Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# भटक्या विमुक्तांची कविता : एक अभ्यास

**विपुल एम. इंगळे** **प्रा.डॉ. राम एम गायकवाड**

**प्रस्तावना :**

जीवनानुभव आणि चिंतनातून काव्य जन्मास येते. मराठी साहित्याचा विचार करता १९६० च्या पूर्वी केवळ म.फुले यांनीच जीवनानुभव यथायोग्य नोंदवून माणूस हा निसर्गाचे अपत्य आहे, त्याला जन्मताच समानता मिळाली आहे. यामुळे भेदभाव करता काम नये, अशी प्रांजळ भूमिका घेऊन लेखन केले. नंतरच्या काळात केशवसुतांनी अशा प्रकारचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. ईश्वर, नश्वरता, अलंकार, वृत्त, छंद, मुक्तछंद या वेगवेगळ्या टप्प्यांवरून मराठी कविता क्रांतीच्या वाटेने प्रवास करताना दिसते. मनोरंजन, सौंदर्य यासारख्या गुळगुळीत संकल्पनांतून मराठी काव्य बाहेर पडत आहे. शेतकरी, कामगार, दलित, आदिवासी, भटके विमुक्त, स्त्रिया या सर्वांनी यासाठी लेखणी उचलल्याचे सांगता येईल. गेल्या पाच दशकांत मराठी कविता वरील सर्वांच्या लेखनामुळे आशय व अभिव्यक्तीच्या दृष्टीने पूर्णपणे बदलली आहे. दलित कवींना सामाजिक जाणिवेकडून विद्रोह आणि पुढे विद्रोहातून मूल्ये प्रस्थापनेकडे होणारी वाटचाल हवी होती. मात्र, तसे घडले नाही. अपवादात्मक काही कवी वगळता इतरांनी वेगळी वाट धरल्याचे दिसून येते. भटके हे दलितच असले, तरी नोंदणीकृत दलितांची आणि त्यांची वेदना समान नाही. हा फरक म्हणजे गावात, गावाशेजारी राहणारे आणि गाव व घर नसणारे समूह असा असल्याने दुःख दोघांनाही आहे. मात्र, यात फरक साहजिकच आहे. लेखनाच्या दृष्टीनेही दलितांची लेखणी तीव्र विरोध करणारी आहे, तर भटक्यांच्या लेखणीत फारशी आक्रमकता पाहावयास मिळत नाही, तरीही हे दोन्ही समूह वेदनेने एकदुसऱ्याशी जोडलेले आहेत आणि या वेदनेचे मूळ शोधताना दिसत आहेत. हा शोध योग्य दिशेने न्यायचा असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान पचवल्याशिवाय पर्याय नाही. कारण कित्येक शतकांनंतर वंचितांना प्रज्ञासूर्याची छाया मिळाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण भारतीय समाजामध्ये एक युगांतर घडवून आणले आहे. या युगांतराच्या प्रवासात मराठी साहित्यानेही वाटचाल सुरू केली आहे. ज्या शोषित, पीडित समाजाला शब्द सापडत नव्हता, त्यांना शब्द सापडू लागला आणि रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग, अशी अवस्था असणाऱ्या समाज घटकांनी साहित्यनिर्मितीला प्रारंभ केला. त्यात एक समृद्ध दालन आहे. भटक्या विमुक्तांनी लिहिलेल्या साहित्याचे. भटक्यांची कविताही याला अपवाद नाही. भटक्यांची ही भूमिका कायम टिकल्यास परिवर्तनास वेग येईल.

घर आणि गाव यांचा पत्ता नसलेला भटका समाज शिक्षणाच्या जवळ गेला आणि अभिव्यक्त होऊ लागला. अवहेलना, भूक, भग्नावस्था, समाजापासून दुरावलेपण, उपरेपणा आणि यातूनच फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराने निर्माण झालेला आशावाद भटक्या विमुक्तांच्या कवितेतून उमटू लागला. कैकाडी समाजाच्या कवींच्या काव्याचा अभ्यास मांडण्यापूर्वी इतर भटक्या विमुक्तांच्या कवितेचा आढावा घेणे उचित ठरते.

**आत्माराम कनिराम राठोड :**

१९४८ ला जन्मलेल्या आत्माराम राठोड यांचे 'काटे आणि कळ्या', 'लदेणी', 'आत्माराम राठोड यांच्या कविता' असे तीन काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. भटक्यांच्या सामाजिक चळवळीशी बांधलेला आणि 'जे जगले आणि भोगले' तेच मांडणारे कवी म्हणून राठोड यांची ओळख सांगता येईल. अगदी शिक्षण घेत असताना येथील समाजाची दिशाभूल करणारा अभ्यासक्रम त्यांच्या लक्षात येतो आणि त्यावर ते भाष्य करतात,

"किती दिवस आणखी
म्हणाल दलित
गाणार
तोच अध्याय
कीव करणार किती?
कुठरवर शिकायचा
शिकारी कुत्र्याचा अभ्यास"[१]

आत्माराम राठोड यांची ही चीड येथील समाजव्यवस्थेला बदलू पाहणारी आहे. त्यांच्या प्रश्नातून हजारो वर्षांपासूनची जात, धर्म, वर्ण व्यवस्था मोडीत निघावी यासाठीचा हुंकार आहे, १९७० च्या नंतरच्या मराठी कवितेत राठोड यांचे स्थान वरचे आहे. त्यांची कविता अस्सल अभिव्यक्ती घेऊन येते. "सामाजिक उत्थानाच्या दृष्टीने समाजसापेक्ष परिवर्तनवादी असलेले हे साहित्य भटक्या विमुक्तांचे दर्शन घडवते."[२] यामुळे त्यांच्या समस्या बहुश्रुत होतात. येथील समाजमनावर पगडा असलेल्या देवतांचाही त्यांनी प्रतीकारत्मक वापर करणे, ही त्यांच्या अभ्यासाची खोली नोंदविण्यासाठी साहाय्यभूत ठरणारी बाब आहे. कृष्णालाही नाकारणारी त्यांची कविता म्हणजे करुणासागर बुद्धाच्या मार्गावरील एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरते. आत्माराम कनिराम राठोड हे ज्या समाज, संस्कृतीत जन्माला आले ती संस्कृतीच त्यांच्या कवितेतून संस्कारित झाली आहे. या संस्कृतीने राठोड यांच्या कवितेच्या कोंबाला उगवण्याचे बळ दिले आहे, असे असले तरी त्यांची कविता सांस्कृतिक उलथापालथ करणारी ठरते.

**रावजी राठोड :**

१९९९ मध्ये 'तांडेल' हे आत्मकथनानंतर महाराष्ट्रात सर्वज्ञात झालेले रावजी राठोड व्यवसायाने प्राध्यापक असले तरी त्यांची सामाजिक बांधिलकीशी असलेली नाळ कायम आहे. 'विमुक्तवेध' लेखसंग्रह 'गोठण' ही कादंबरी आणि 'मालाण' हा कवितासंग्रह, अशी त्यांची लेखन संपदा आहे. जन्माने भटके असल्याने कोणतीही समृद्ध परंपरा त्यांच्या वाट्याला आली नाही. शाळेची फीस, पाटी, पेन्सिल, वह्या, पुस्तके घेण्यासाठी पैसा नसल्याने अनेक हाल अपेष्टा झेलत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. नोकरीनंतरही राठोड यांना अनेक प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागल्याने कायमस्वरूपीच अस्थिर दिवस त्यांच्या वाट्याला आले. या सर्व जीवनानुभवास २००४ साली 'मालाण' या अभिव्यक्तीने त्यांनी कवितांच्या स्वरूपात वाचकांसमोर ठेवले. 'बा'ला अर्पण केलेल्या कवितासंग्रहात कविता वेगवेगळे प्रश्न उभे करतात. त्यांच्या कवितेविषयी रंगनाथ पठारे म्हणतात, "माणसाच्या जगण्याच्या पिढ्यान्पिढ्यांच्या परवडीतून यांच्या भाषासंस्कृतीचे काय होते व पुन्हा तीच त्यांच्या जगण्याला बळही कशी देते, याचे अत्यंत संयमी व अस्सल दर्शन आत्मपर लेखनात झाले आहे."[३] पठारे यांनी काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत वरील मांडलेले मत म्हणजे राठोड यांच्या कवितेचे अतिशय योग्यरीतीने केलेले परीक्षण आहे. रावजी राठोड केवळ जीवनानुभव व्यक्त करीत नाहीत, तर ते समाजाला क्रांती करण्यासाठी आवाहनही करतात. त्यांची खालील कविता फार बोलकी आहे,

" लाचार मायबापांनी खदखदणे पुरे झाले आता
आता गदगदणारा ग्रंथ व्हा
डोळ्यात खादाणी रग्गेल त्यांच्या उकळता सांडा तुमचा लाव्हा "[४]

हजारो वर्षे दुःखाच्या खाईत खितपत पडलेले समाजबांधव आता जागे झाले आहेत. त्यांना ही रूढी, परंपरांनी घालून दिलेली गुलामी झुगारून द्यायची असल्याने कवी 'तुमच्यातील धिक्काराचा, चीड आणणारा लाव्हा' विरोधकांवर सोडण्याचे आवाहन करत आहे. लाचारी सोडून परिवर्तनाच्या रन मैदानात उडी घेण्याचा सल्ला देताना कवी वाईट इतिहासाची आठवण देखील करून देत आहे.

**भीमणीपुत्र मोहन नाईक**

मोहन नाईक यांचा जन्म १९५० साली किनवट तालुक्यातील चिंचखेड या लहान गावी झाला. व्यवसायाने शेतकरी असलेले नाईक समाजातील दारिद्र्य, वंचितावस्था पाहून व्यथित होतात. समाजाच्या व्यथा, वेदना जाणून घेण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रभर भटकंती केली. 'केसूला' हा त्यांचा कवितासंग्रह त्यांच्या या समाजविषयक जाणिवेचा लेखाजोखा आहे. त्यांची कविता समता, न्याय, बंधुत्व या नीतिमूल्यांची रुजवणूक करताना दिसते. डॉ. रमेश जाधव हे देखील प्राध्यापक व सामाजिक चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते आणि समाजपरिवर्तनाचा ध्यास असलेले एक महत्त्वाचं नाव आहे. डॉ. जाधव म्हणतात, "समाजप्रबोधन, उद्बोधन उत्थान आणि इतिहास अवलोकनाच्या दृष्टीने या कविता लिहिल्या गेल्यामुळे केसूला म्हणजे गोरगबाच्या काळातील पडद्याआड दडल्या गेलेल्या गोर संस्कृतीची शौर्यगाथा होय"[५] जाधव यांचा हा अभिप्राय फार बोलका आहे. येथील जटील समाजव्यवस्था सामान्य माणसांसाठी जीवघेणी ठरत आहे. जाती-धर्माची उतरंड दमकोंडी करत असल्याने जगण्यातील दुःख वाढीस लागले म्हणून येथील समाज व्यवस्थेविषयी कवी भाष्य करतो.

"हरिजन .?  
म्हणे ही देवाची लेकरे  
या नावाखाली  
ठेवलेत त्यांना उपरे  
या लेकराची सावली ही  
अंगावर पडली की  
बाटत होते म्हणे सारे"[६]

वरील कवितेतून येथील प्रस्थापित व्यवस्थेत रुजलेले पाखंड कवीने नोंदविले आहे. समाजातील विरोधाभास कवी शब्दबद्ध करून येथील समाजव्यथेवर नेमकेपणाने बोट ठेवतो.

**प्रभंजण चव्हाण**

वंचित आणि दीन-दुबळयांच्या चळवळीस सारे आयुष्य वेचलेल्या म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीस अर्पण केलेल्या 'ऊर्जेची स्वगते' हा चव्हाण यांचा कवितासंग्रह २००७ मध्ये प्रकाशित झाला. या कवितेतून भटक्यांच्या मुक्या जीवनास वाचा फोडण्याचे काम केले आहे. चिंतन आणि आत्मियता अशी ओळख त्यांच्या कवितेने निर्माण केली. त्यांच्या कवितेत मानवतावाद आतपर्यंत भरलेला आहे. ते लिहितात,

"तम सोता आपणेम  
दिवो लगा सकोचा ।  
कोयी केनी भजो- पुजो मत "[७]

या कवितेच्या ओळींमधून कवी स्वयंप्रकाशित व्हा, कोणी सांगते म्हणून विश्वास ठेवू नका, स्वतः जाणून घ्या, स्वतःच्या डोळयांनी जगाकडे पाहा, अशी शिकवण कवी देत आहे. त्यांच्या विचारांची भगवान बुद्धांशी नाळ असल्याचे स्पष्ट दिसते. बुद्धांच्या तत्त्वांत मानवी नीतिमूल्ये, ज्यामध्ये स्वातंत्र्य, समता, न्याय यांचा समावेश होतो. ती सर्व चव्हाणांनी स्वीकारली आहेत. या मूल्यांचे बीजारोपण करतानाच त्यांची कविता समाजात आजवर चालत आलेल्या रूढी, अंधश्रद्धा झुगारून देण्याचा सल्ला देते. ते लिहतात,

"मी ठोकरतोय इथली अमानुष पोथिनिष्ठा  
ज्यांच्या भटगिरीतून घडले रक्तपात  
माणसाला नशेत ठेवून कोंबला गेला  
फसवा इतिहास आजपर्यंत डोक्यात "[८]

समाजाला डोळस करण्यासाठी चव्हाण यांनी पोथी, पुराणांपासून दूर होण्याचा सल्ला दिला कवीने दिला आहे. कारण, भारतीय जातींचा उगमच मुळात येथील धर्मग्रंथातून झाला आहे. मनूसारख्या मानवतेच्या शत्रूने येथील शूद्रातिशूद्र समाज तर नाकारलाच, शिवाय स्त्रीलादेखील पशूपेक्षा हीन समजले. या सर्व बाबीची नोंद चव्हाण यांची कविता घेते. येथील वर्ग आणि वर्ण व्यवस्था हजारो वर्षांपासून कायम वंचित, पीडित समाज घटकांचे रक्त पीत आहे. या सर्व परिस्थितीला विरोध करणारी प्रभंजन चव्हाण यांची कविता प्रज्ञासूर्याच्या तेजाने प्रवाहित होते.

**जवाहर राठोड :**

व्यवसायाने प्राध्यापक असलेले राठोड राजकीय भाष्यकार होते. सामान्यांच्या कल्याणासाठी राजकारण केले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी घेतली. दऱ्याखोऱ्यात भटकणाऱ्या, अन्नपाण्यासाठी वणवण करणाऱ्या समाजाच्या वेदनेस वाचा फोडणारा त्यांचा 'डोंगराचे ढोल' हा कवितासंग्रह भटक्या विमुक्तांच्या साहित्यातील महत्त्वाची भूमिका मांडणारी अभिव्यक्ती आहे. सुंदर समाजनिर्मिती हेच त्यांच्या कवितेचे सारतत्त्व आहे. तांड्यातील जीवन, मसनजोग्याच्या व्यथा, सामाजिक विषमता, भटक्यांची मरणासन्न अवस्था आदी विषयांना घेऊन त्यांची कविता जागृती करते. येथील शोषक आणि शोषित यांच्यातील संघर्षाची नोंद राठोड यांच्या कवितेने घेतली. कवीने भटका समाज आणि तांडा याविषयीचे संबंध नोंदवले आहेत ते लिहितात,

" तांडे – गुन्हेगार
तांडे–चोर, लुटारू, दरोडेखोर,
तांडे– भटकतात, भरडले जातात
तांडे– ओरडतात, सुया घ्या पिना घ्या
पोत घ्या, लाव्हर घ्या, चितर घ्या पण,
कौरवाच्या राजदरबारातील
द्रौपदीच्या अब्रूचे मोल द्या"[९]

वरील कवितेतून जवाहर राठोड यांनी भटक्या समाजाची स्थिती वर्णन केली आहे. हजारो वर्षांपासून प्रस्थापित समाजाने भटक्यांना चोर, लुटारू, गुन्हेगार ठरविले.

**रतन आडे :**

'आथारी' हा कवितासंग्रह लिहून रतन आडे यांनी चिंतनशीलता आणि परिवर्तनाची वाट अधोरेखित करण्यास सुरुवात केली. हा त्यांचा पहिलाच कवितासंग्रह असल तरी यात कुठेही नवखेपणा आढळत नाही. या कवितांविषयी शिवाजी घुगे प्रस्तावनेत लिहितात, "आथारीमधील कविता आंतरआत्म्याचा संघर्ष प्रकट करणारी कविता आहे. कधी सामाजिक बांधिलकीची कास धरत वर्तमान सामाजिक व्यवस्थेत बदलाची मागणी करते, तरी कधी शृंगार लेणे वेचून आनंदोत्सवात तल्लीन होऊन जाते. कधी ती खोल तलावात कोसळणाऱ्या प्रयाताप्रमाणे अंगावर कोसळायला लागते. समाजातील अनिष्ठावर प्रहार करणारी रतन आडेंची कविता जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे समग्र चिंतन आहे."[१०] वर्तमातील विसंगती आडे यांच्या लेखनाचा विषय होऊन जाते. यावर भाष्य करत त्यांची कविता समानतेचा आग्रह धरते आहे. समाजात सामान्यांची होणारी फसवणूक त्यांना पाहावत नाही. आशावाद व्यक्त करताना कवी आडे प्रस्थापितांचा इशारा देत लिहितात,

"अंधश्रद्धेचा साज नको, हवे आता विज्ञान
ढोंगी साधू, संत, महंत बंद करा व्याख्यान"[११]

जगातील ढोंगी लोकांना कवी त्यांच्या पोकळ गप्पा बंद करण्याची सूचना देत आहे. त्यांच्या या निरर्थक वर्तनुकीने हजारो वर्षे इथला समाज अंधारमय अवस्थेत जगला आहे. तीव्र शब्दात दोष स्पष्ट करत प्रतिमांचा वापर करून अभिव्यक्त होणे, हे आडे यांच्या कवितेचे वैशिष्ट्य मानावे लागते.

**प्रेमदास राठोड :**

व्यवसायाने शिक्षक असलेल्या प्रेमदास राठोड यांच्या वडिलांच्या निधनाने कृपाछत्राशिवाय संघर्ष करण्याचा प्रसंग ओढावला. मानवी अस्तित्वाच्या लढाईत जे काही जिंकले आणि प्रगतिपथावर गेले, अशा समाजबांधवांनी पाठीमागे डुंकूनही पाहिले नाही, याचे शल्य त्यांच्या मनात कायम आहे. समता प्रस्थापित करायची असेल तर समाजाला पुढे नेण्यासाठी योगदान दिले पाहिजे, ही त्यांची अतिषय प्रांजळ भावना त्यांच्या कवितेतून अभिव्यक्त होते. ते लिहितात,

"शिकून गेले तांड्याचे लाल
तांड्याचे मात्र तसेच हाल"[१२]

कवी प्रेमदास राठोड यांचा तांड्याला सावरण्याचा प्रयत्न इतर अनेक वंचित, पीडित जाती–जमातींत पाहावयास मिळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही 'मला माझ्या सुशिक्षित तरुणांनी फसवले,' अशी खंत व्यक्त केली होती. शिकून आपण प्रस्थापित झाल्यानंतर उर्वरित समाज या मार्गाने आणण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी आपल्यावर असते. मात्र, तांडा संस्कृतीसह इतरांतील ही जगण्याची चुकीची पद्धत कवीला आवडलेली नाही. 'गराशा', 'बंब' तसेच 'रानवा' या तिन्ही कवितासंग्रहांतून कवीने असे अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. प्रत्येक समाजातील पुढारलेल्या लोकांनी केवळ स्वत:ची घरं भरण्याचे कार्य केले आहे. त्याचा परिणाम इतरांच्या जीवनावर होत असतो. हजारो वर्षांपासून सुरू असलेली वाताहत थांबण्याचे वंचितांचे स्वप्न नेते मंडळी सत्यात उतरू शकतात. मात्र, तसे होताना दिसत नाही. या सर्व बाबींची नोंद राठोड यांची कविता घेते.

**उत्तम राठोड :**

तांड्यावर कामगाराच्या पोटी जन्मलेल्या उत्तम राठोड यांनी लाकूडतोड्या म्हणून आयुष्यास सुरुवात केली. फुले, शाहू, आंबेडकरी विचाराने प्रभावित झालेले राठोड यांनी आयुष्यभर खस्ता खाल्ल्या. मात्र, शिक्षणाची कास सोडली नाही. उपजिल्हाधिकारी पदापर्यंत त्यांनी मजल मारली. हातावरची पोटं त्यांनी आयुष्यभर जवळून पाहिली असल्याने तेच त्यांच्या लेखनाचा विषय झाले. 'व्यासपीठ' हा कवितासंग्रह आणि 'नवे पर्व', 'तुझा गोंधळ मांडियेला' ही दोन नाटके लिहून त्यांनी भटक्यांच्या वेदनेस वाचा फोडण्याचे कार्य केले आहे.

१९९७ मध्ये त्यांचा 'व्यासपीठ' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. निसर्ग, जगण्यातील विसंगती, उपहास, उपरोध, प्रेमानुभव व शृंगार ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत. ते लिहितात,

"ही भूक मानवाची
तृष्णा अतृप्ततेची
पिवळ्या कोवळ्या किरणाला
झालर वासनेची'[१३]

वरील ओळींतून राठोड यांनी मानवाची शारीरिक व मानसिक भूक किती प्रबळ व व्यापक असते याची नोंद घेतली आहे. माणूस आयुष्यभर हीच भूक थंड करण्यासाठी जगतो आहे का, असा प्रश्न कवीला पडतो आहे. अखंड समाज अशा तृष्णेत गुंतलेला आहे, हे शल्य राठोड यांच्या कवी मनाला बोचत आहे.

**राजाराम जाधव :**

अडाणी आई–वडिलांनी आपण शिकलो नाही, याचे दु:ख न मानता आपला मुलगा खूप मोठा साहेब व्हावा आणि मग आपण साहेबाचे मायबाप म्हणून मिरवू, अशी महत्त्वाकांक्षा असलेले कवीचे आई–वडीलच त्यांच्या जीवनाचे शिल्पकार ठरतात. लोकसेवा आयोगाची परीक्षा पास करून साहेब झाल्यानंतरही त्यांनी समाजाशी असलेली नाळ कधी तुटू दिली नाही. भुकेल्या अवस्थेत आयुष्य काढणारा भटका समाज 'वादळवारा'तून जगण्याची स्थिती किती वाईट असते याची नोंद ते घेतात,

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

"दारिद्र्य ज्वालेने
होरपळलेल्या संसाराची
घडी नीट बसवावी म्हणून
उपासाची ठिगळं लावून
जगत होती आई"[१४]

जगण्यासाठी आतोनात प्रयत्न करताना कित्येक वेळा उपासमारीची आईवर आलेली वेळ कवीने येथे नोंदवलेली आहे. सामाजिक विषमतेचे हे विदारक चित्र कधीतरी बदलेल, अशी आशा कवीला आहे.

**एकबाल पेंटर :**

कालोघात जागतिकीकरणाचे वारे सर्वदूर पोहोचत असल्याने चळवळीचा गळा घोटला जात आहे. अशाप्रसंगी चळवळीतील काही लोक एकतर राजकारण्याच्या बगलेत गुदमरत आहेत. नसता लेखणीने संघर्ष करत आहेत. लेखणीच्या जोरावर लढा देणाऱ्यांपैकीच एक नाव एकबाल पेंटर आहे. 'बळी' या काव्यसंग्रहातून त्यांचा लढा प्रवाहित होताना दिसतो. १९९० नंतरची सामाजिक उलथापालथ त्यांनी अभिव्यक्तीचा विषय बनवला आहे. २००७ ला त्यांचा कवितासंग्रह प्रकाशित झाला. उपमा, अलंकार यांचा कुठेही सोस नसल्याने त्यांची कविता सामान्य वाचकाच्या सहज पचनी पडते. सामान्य माणूसच त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू आहे. ते लिहितात,

"स्वातंत्र्यासाठी लढणारे ठरवले दरोडेखोर
इंग्रजांना शरण गेलेले झाले देशभक्त
हा खोटा इतिहास लिवणाऱ्यांना
क्षमा नाही
भटक्या भावारं, आदिवासी भावारं
आता संघर्षाची पेटवा मशाल"[१५]

संभाजी भगत यांच्या पवाड्याप्रमाणे शब्दकळा असलेली पेंटर यांची कविता येथील सर्व वंचितांना त्यांच्या दु:खातून बाहेर काढण्याची शिकस्त करत आहे. चुकीचा इतिहास लिहिणारांना ते जाणीवपूर्वक निशाणा बनवत आहेत. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात ज्या आदिवासी, भटक्यांनी प्राण पणाला लावले त्यांच्यावर चोर, लुटारू, गुन्हेगार असे आरोप लावले आणि इंग्रजांच्या पायाशी लोळण घेणाऱ्यांना देशभक्त ठरविणारी ही व्यवस्था न्यायाच्या दृष्टीने किती वांझ आहे, ते कवी स्पष्टपणे नोंदवतात. हे कवीचे धाडस म्हणजे राज्यघटनेचे यश मानावे लागते.

**पी. विठ्ठल :**

प्राध्यापक असणारे पी. विठ्ठल हे १९९० नंतरच्या महत्त्वाचे नाव आहे. 'विध्वंसाचे सुरुंग' (२००१), 'सखी आणि मी एक विसंवाद' (२००१), 'माझ्या वर्तमानाची नोंद ' (२०११) असे तीन कवितासंग्रह पी. विठ्ठल यांच्या नावावर आहेत. माणसाचे स्खलन, पाश्चात्त्य संस्कृतीचं अंधानुकरण यातून आलेला यांत्रिकीपणा हा त्यांच्या कवितेचा मध्यवर्ती बिंदू मानावा लागतो.. अत्यंत पारदर्शी विचार त्यांच्या लेखनातून दिसून येतात. दैनिक पुण्य नगरीमधील 'पुनर्निर्माणासाठी एक पाऊल' या लेखात त्यांनी येथील विषमतावादी व्यवस्थेवर प्रखड भाष्य केलेले आहे. येथील उपेक्षित पारधी समाजाच्या तरुणावर झालेल्या अन्यायाच्या संदर्भाने त्यांनी हे लेखन केलेले आहे. ते त्यात म्हणतात, "ज्या समाजात आपण राहतो, त्या समाजात जर भुकेचे प्रश्न सुटत नसतील, तर तो समाज आपला समाज कसा ? जो समाज माणूस म्हणून स्वीकारत नसेल, तो समाज आपला कसा? इथली भ्रष्ट व्यवस्था जर गोरगरिबांपर्यंत मूलभूत गोष्टीच पोहचवू देत नसेल, तर तो समाज आपला कसा? असे एक ना अनेक प्रश्न आपल्यापुढे उभे राहतात आणि आपण केवळ अस्वस्थ होण्याशिवाय काहीच करू शकत नाही. भुकेचेच प्रश्न सुटणार नसतील तर आत्मसन्मानाचे प्रश्न सुटणार कधी, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो"[१६]

कवी पी. विठ्ठल सामाजिक प्रश्नांचे भान असलेले कवी आहेत. त्यांचा गद्य आणि पद्य लेखनात एकूण भारतीय समाजव्यवस्थेची चिरफाड पाहावयास मिळते. अठरापगड जाती आणि काही धार्मांनी मिळून बणलेल्या या भारत देशात सीमांतरर्गत या जाती आणि धर्मांचे जसे स्वतंत्र राष्ट्र असावे, तशीच नियमावली येथील व्यवस्थेत ठरलेली दिसते. या सामाजिक बाबींवर ते प्रहार करतात. कवी ज्याप्रमाणे येथील शिक्षण हा सर्वव्यापी विषय हाताळताना दिसतात, त्याचप्रमाणे जागतिकीकरण आणि त्याचे परिणाम यावरही भाष्य करतात. जागतिकीकरणातून येथील संस्कृतीत झालेला बदल किती भयावह आहे. याची नोंद त्यांची कविता घेते. खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाने येथील समाज अर्थकेंद्री बनला. परिणामी सामान्य माणूस हा अर्थकेंद्री बनला. परिणामी सामान्य माणूस हा अतिसामान्य होत चालला आणि प्रस्थापित वर्ग आणखी प्रगती करताना दिसत आहे. मात्र, या विकासाच्या वाटेवर त्यांनी जात, धर्म, पंथ आणि प्रांत असे भेदभाव करून समाजातील दरी वाढीस लावली आहे. कवी पी. विठ्ठल 'महासत्ता वगैरे' या कवितेत म्हणतात,

"तू म्हणालीस
कुठल्याही तत्त्वांच्या, कुठल्याही सत्वाच्या
गोष्टी करू नकोस
म्हणून मी गप्प बसलो
मग माझ्या उघड्या डोळ्यादेखत
त्यांनी डोंगराची त्वचा सोलून काढली "[१७]

वरील कवितेतून महासत्ता आणि येथील सामान्य माणसाचा वर्तमान यावर कवीने परखड मत मांडले आहे. माणसांबरोबर येथील निसर्ग आणि पशुपक्षांवरही जागतिकीकरणाचा कसा विदारक परिणाम होत आहे, याचे बोलके चित्र म्हणजे पी. विठ्ठल यांची वरील कविता आहे.

**कैलास दौंड :**

ग्रामीण भागातील जन्म आणि बालपणही खेड्यात शिवाय शिक्षकाची नोकरीही जिल्हा परिषदेच्या खेड्यातील शाळेवर असल्याने व स्वत: भटक्या जमातीत असल्याने तांडा संस्कृती कैलास दौंड यांना जवळून पाहावयास मिळाली. परिणामी त्यांच्या कवितेचा विषयच ग्रामीण समूहाचे आक्रंदन मांडणे, हा झालेला दिसून येतो. पावसाच्या अवेळा, दुष्काळ यातून ग्रामीण संघर्ष किती विकोपाला जातो याचे चित्रण त्यांच्या कवितेतून येते. ऊसतोड करणारे तांडे पोटभर घासाला कशा प्रकारे मोताद होतात हे वास्तव त्यांची कविता समर्थपणे मांडते आहे. ऊसतोडीच्या व्यवसासयाने नेहमीची भटकंती त्यातून तांड्यांना निर्माण होणारी आर्थिक होरपळ हे विषय घेऊन त्यांची कविता प्रवाहित होताना दिसते. 'भोग सरू दे उन्हाचा' या कवितासंग्रहातून दौंड यांनी दुष्काळछायेत वावरणाऱ्या शेतकऱ्याचे वर्णन केलेले आहे. नेहमीची नापिकी आणि व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणुकीला शेतकरी कसा बिनभोबाट सामोरा जातो, त्यातून त्याच्या समस्यांत कशी भर पडत जाते व तो आत्महत्येला कसा बळी पडतो, याचं भीषण चित्रण त्यांची कविता करते. 'तांडा' या त्यांच्या दीर्घ कवितेत तांड्यावरील जीवघेणा संघर्ष अधोरेखित झालेला आहे. नेहमीची भटकंती प्रस्थापित समाजव्यवस्थेपासून दूर लोटत जाते आणि जीवनाला बकाल अवस्था कशी प्राप्त होते, याची नोंद त्यांची कविता घेताना दिसते. ते लिहितात,

"दिवसा दुपारी ओस तांडा
लिंबाखाली बसून डोखरा
मर्जीनुसार मास्ताराची शाळा
तांड्याकडे बघून मारोती मोकळा
रानोमाळ कष्टतात याड्या"[१८]

वरील कवितेतून कवीने तांड्यावरील समाज किती भयावह जीवन जगत आहे, याची नोंद घेतली आहे. मानवाच्या मूलभूत गरजांमध्ये अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण यांचा समावेश जागतिक आरोग्य संघटनेने केला. मात्र, तांड्यावर घर, पाणी आणि भविष्य व वर्तमानासाठी पैसाही नसल्याने भारतीय स्वातंत्र्याने या समाजाला नेमके दिले तरी काय, असा प्रश्न पडतो. कारण तांड्यावरील भविष्य उज्ज्वल होण्यासाठी शिक्षणासारखा प्रभावी मार्गही मोडकळीस आल्याचे चित्र कवीला पाहावयास मिळत आहे. मग या समाजात आत्मभान तरी कसे येईल? व समानतेच्या पातळीवर येण्यासाठीचा काळ यातून नक्कीच वाढत जाईल. लोकशाहीचे हे अपयश त्यांच्या कवितेतून दौंड अधोरेखित करताना दिसून येतात.

**नागराज मंजुळे :**

वडार या भटक्या समाजातील नागराज बाबूराव मंजुळे महाराष्ट्रभर चित्रपट दिग्दर्शक म्हणून ज्ञात आहेत, ते त्यांच्या 'सैराट' या चित्रपटामुळे. तसेच त्यांचा कैकाडी समाजाचे दुःख वेशीवर टांगणारा 'फॅन्ड्री' हा चित्रपट चर्चेचा आणि मंथनाचा विषय झाला आहे. मूलतः सामाजिक भान असलेल्या नागराज मंजुळे यांची समतावादी दृष्टी त्यांच्या लेखनातूनही दिसून येते. वेदना आणि नकाराने ठासून भरलेल्या दलित साहित्यापासून प्रेरणा घेऊन लेखन करणाऱ्यांपैकीच मंजुळे आहेत. ते त्यांच्या अभिव्यक्तीतून दिसून येते. 'उन्हाच्या कटाविरुद्ध' हा त्यांचा प्रकाशित कवितासंग्रह आहे. लेखनासाठी पेन उचलण्यामागील त्यांची भूमिका नेमकेपणाने मांडणारी त्यांची कविता पुढीलप्रमाणे आहे,

"माझ्या हाती
नसती लेखणी
तर...
असती छन्नी,
सतार, बासरी
अथवा कुंचला
मी कशानेही
उपसत राहिलो असतो
हा अतोनात कोलाहल आतला"[११]

या लहान आकारातून कवीने फार मोठा आशय सांगितला आहे. वडार समाजातील मंजुळे यांनी लेखन सामर्थ्य मिळवले नसते तर परंपरेने हजारो वर्षांपासून हाती दिलेली छन्नी, सतार कायम असता. मात्र, असे असले तरीही आपण मनातील कोलाहलच मांडला असता. याशिवाय दुसरे काहीही केले नसते. कारण जात म्हणून वाट्याला आलेले भोग कुणाही व्यक्तीसाठी जीवघेणे ठरतात. माणूस म्हणून समानतेची वागणूक अपेक्षित ठेवत कवी मंजुळे विद्रोहाची भूमिका घेताना दिसतात. नागराज मंजुळे नव्या पिढीतील महत्त्वपूर्ण कवी आहेत. त्यांच्या जीवनातील कटू अनुभव त्यांना कवितेतून मुखर केलेले आहेत. त्यांच्या काव्यातून अस्तित्वलक्षी विचारांचा प्रवाह अखंडपणे वाहत असून समाजाचे वस्तुनिष्ठ चित्रण त्याद्वारे समोर येते. त्याबरोबरच त्यांची विज्ञानवादी दृष्टीची साक्ष मिळते.

**सुदाम राठोड :**

प्राध्यापक आणि कीर्तनकार असलेले सुदाम राठोड येथील शिक्षण, समाज, धर्म, राजकारण, अर्थकारण या सर्वच विषयांचा समावेश आपल्या लेखनात करतात. त्यासोबतच साहित्य हा विषयही त्यांच्या कवितेचा होऊन जातो, तेव्हा भालचंद्र नेमाडेंसारखा मोठा मानल्या गेलेला लेखकही ते भोंदू ठरवतात.

'मिसकॉल' या बहुचर्चित कादंबरीनंतर त्यांच्या कविता लेखनाने मराठी काव्याला प्रखर व परखडतेची ओळख करून दिली आहे. त्यांच्या सर्वच कविता पुस्तकरूपाने आल्या नसल्या, तरी वेगवेगळी साहित्य

संमेलने, फेसबुक व विविध कार्यक्रमांतून जनमनावर त्यांच्या कवितेने वेगळा ठसा उमटविला आहे. येथील समाज व्यवस्थेवर भाष्य करताना कवी वेगवेगळ्या प्रतिमा वापरत लिहितात,

"कोरभर भाकरीत आमच्या जिंदग्या गुंडाळून
कंगालीचे मुसळ घरादावर फिरवणारे हात
उगवतायेत देशाच्या नकाशातून
भसाभस कुठूनही तद्दन बदलत केंद्रे
सांगा स्वामी, आम्ही कुणाकुणाची भोकं बुजवावीत "[२०]

वरील कवितेतून येथील व्यवस्था किती भयावह आहे, परिणामी सामान्यजन कसा नागावला जात आहे, याचे चित्रण येथोचित प्रकारे सुदाम राठोड यांनी केलेले दिसून येते. येथील वर्णव्यवस्था, जाती व्यवस्था आणि धर्म व्यवस्था त्यासोबतच लोकशाहीचेही धिंडवडे राठोड काढताना दिसत आहेत. त्यांची अभिव्यक्ती मुळातच व्यवस्थेला सुरुंग लावणारी व विज्ञानवादी, समतावादी दृष्टिकोन निर्माण करणारी आहे.

**वीरा राठोड :**

वीरा राठोड हे नवकवींपैकी एक आहेत. त्यांचा 'सेन सायी वेस' हा कवितासंग्रह मोठा चर्चेचा विषय ठरला. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त या काव्यसंग्रहातून 'सर्वांचं कल्याण कर' अशी प्रार्थना करण्यात आली आहे. मानवतेची आस धरणारी त्यांची कविता येथील वंचितांच्या न्यायासाठी लढा उभारताना दिसते. ते आपल्या कवितेविषयी लिहितात,

"हा उधळलाय भंडारा काय व्हायचं ते होऊदे! ही कविता नाहीये केवळ ही आहेत आरोळ्या ठोकत उजेडाच्या आसेने चालती झालेली बिनभरवाश्याची पावले "[२१] कवीने आपल्या कवितेला प्रकाशवाटेवरील प्रवास ठरविले आहे, त्यामुळे निश्चितच त्यांची कविता या भयव्याकूळ व्यवस्थेत वंचितांना उभारी देण्यासाठी कारणीभूत ठरेल यात शंका नाही. एकूणच भटक्या विमुक्तांची कविता येथील व्यवस्थेकडे माणूस म्हणून स्वीकारण्यासाठी हाक देताना दिसते. हजारो पिढ्यांपासून होत असलेले शोषण थांबून समाजात समानता, न्याय प्रस्थापित करण्याचा या काव्यलेखनातून प्रयत्न होताना दिसून येतो.

**संदर्भ :-**


१) राठोड आत्माराम, लदेणी, शब्दलोक प्रकाशन, पुसद, प्र. आ.
२) राठोड विनोद आत्माराम, कनिराम राठोड यांच्या कविता, भाषा पब्लिकेशन, वडोदरा, प्र.आ.२०१० पृ.क्र.३
३) पठारे रंगनाथ (प्रस्तावना), मालाण, इसाप प्रकाशन, नांदेड प्र.आ. २००४, पृ.क्र.४३
४) तत्रैव पृ.क्र.१६
५) जाधव रमेश, विमुक्तरंग, गोरवाणी प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.२००८ पृ.७७
६) नाईक मोहन, केसूला, प्र.आ. २००३, पृ.क्र.४०
७) चव्हाण प्रभंजण, ऊर्जेची स्वगते, निर्मोही प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००७, पृ.क्र.१०
८) तत्रैव पृ.क्र.१८
९) राठोड जवाहर, डोंगराचे ढोल, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ.१९७५, पृ.क्र.१३
१०) आडे रतन, आथारी, अंकुर प्रकाशन, अकोला, प्र.आ.२००८, पृक्र.१३
११) तत्रैव पृ.क्र.१३
१२) राठोड प्रेमदास, रानवा, प्रकाशक सीमा प्रेमदास राठोड, प्र.आ.२००९ पृ.क्र४२
१३) राठोड उत्तम, व्यासपीठ, प्रकाशक जयश्री शिंदे, प्र.आ. २००१ पृ.क्र.२१,२२.
१४) जाधव राजाराम, वादळवारा, प्र.आ.२००४, पृ.क्र.३९

१५) पेंटर एकबाल, बळी, प्रकाशक मोतिराज राठोड, प्र.आ. २००७, पृ.क्र.२७
१६) पी. विठ्ठल, पुण्यनगरी, संपादकीय पान, शुक्रवार, २ ऑक्टोबर २०१५
१७) पी. विठ्ठल, माझ्या वर्तमानाची नोंद, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.२०११ पृ.क्र.११६
१८) दौंड कैलास (गोरवाणी संपा. रमेश जाधव), दिवाळी अंक २०११, पृ.क्र. ५८
१९) मंजुळे नागराज, उन्हाच्या कटाविरुद्ध, माइंड ॲण्ड मीडिया प्रकाशन, नागपूर, प्र.आ.२०१० पृ.क्र.४
२०) राठोड सुदाम, स्वामी, अप्रकाशित कविता
२१) राठोड वीरा, सेन सायी वेस, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २०१४